शिक्षा अंतिम करणेबाबत.
(श्री.रविंद्र गुलाब शेलार, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत -वडगाव तनपुरा, ता.कर्जत यांचे गैरवर्तनाबाबत.)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२९६/२०२६
दिनांक- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३(४) नुसार
२. विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील नियम २.२-(ब)
३.या कार्यालयाकडील दोषारोपपत्र/ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्राप-३/२५६/२०२०, दि.३/३/२०२०
४. श्री.शेलार रविंद्र गुलाब, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडगांव तनपुरा ता.कर्जत यांचा खुलासा दि.१८/३/२०२०
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (५)
६. या कार्यालयाकडील आदेश क्रं.साप्रवि-२/ग्राप-३/४०२/२०२० दि.८/६/२०२०
७. सहा.आयुक्त चौकशी, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्रं.विशा-४/खचौ/ सी.आर. ५९/२०२०, दि.१७/११/२०२१
८. या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि- २/ग्राप-३/३७/२०२२ दि.१३/०१/२०२२
९. या कार्यालयाकडील शिक्षेचा आदेश क्रं.साप्रवि-२/ग्राप-३/१२-२०२०/५१९/२०२२ दि.२९/६/२०२२
१०. अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील अपील क्रं.४२/२०२२, दि.२४/०२/२०२३
११.या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/८३०/२०२३ दिनांक ३१/१०/२०२३
१२.या कार्यालयाकडील पुन:स्थापित आदेश साप्रवि क्र.ग्रापं-३/१५८/२०२६, दिनांक ०५/०५/२०२६.

संदर्भ क्रमांक ३ अन्वये, श्री.शेलार रविंद्र गुलाब, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडगांव तनपुरा ता. कर्जत यांच्याविरुध्द दोषारोप बजावण्यात येऊन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. संदर्भ क्र.७ अन्वये विभागीय चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषसिध्दतेच्या अनुषंगाने श्री शेलार यांना संदर्भ क्र.९ अन्वये जिल्हा परिषद सेवेतुन सक्तीने सेवानिवृत्त करणे, ही शिक्षा अंतिम केली होती. श्री.शेलार रविंद्र गुलाब, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडगांव तनपुरा ता. कर्जत यांनी संदर्भ क्र.९ च्या आदेशाविरुध्द अपर आयुक्त नाशिक यांचेकडे अपील दाखल केले. अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील संदर्भ क्र.१० च्या आदेशानुसार अपील अंशत: मान्य करण्यात येऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संदर्भ क्र.९ चे आदेश रद्द करुन अपिलार्थीस सबळ पुराव्यासह त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन दोषसिध्दीच्या प्रमाणात फेर आदेश पारित करावा, असा आदेश पारीत करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने श्री शेलार यांची दिनांक २०/११/२०२३ व दिनांक १५/०५/२०२४ रोजी सुनावणी घेऊन त्यांचे म्हणणे सादर करणेबाबत संधी देण्यात आली. श्री शेलार यांनी दिनांक २०/०६/२०२४ व दिनांक ०७/१०/२०२४ नुसार लेखी म्हणणे सादर केले आहे. श्री शेलार रविंद्र गुलाब, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत वडगांव तनपुरा,ता.कर्जत यांचा खुलासा व म्हणणे विचारात घेऊन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (४) नुसार समयश्रेणीतील निम्न स्तरावर आणणे, ही शिक्षा या आदेशान्वये खालीलप्रमाणे अंतिम करण्यात येत आहे.

अ. पदावनतीचा कालावधी ०२ वर्षे राहील.
ब. शासकीय कर्मचा-यास त्या कालावधीमधील वेतनवाढी मिळणार नाही.

क. असा कालावधी समाप्त झाल्यानंतर पदावनतीमुळे त्यांच्या भावी काळातील वेतनवाढी पुढे ढकलल्या जातील.

सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 202607230904 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 23-07-2026 21:53:39

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री.रविंद्र गुलाब शेलार, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडगांव तनपुरा,ता.कर्जत.

व्दारा :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव

२/-सदरचे आदेश संबंधितास बजावून बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत व मुळ सेवा पुस्तकात घेतलेल्या नोंदीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करणेत यावी.

३. गटविकास अधिकारी पंचायत समिती कर्जत.